फेब्रुआरी. १८७७.

निबंधमाला.

अंक ३८.

रसायनशास्त्र.

अनंतपारं किल शब्दशास्त्रं
स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ।
सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु
हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥

पुणे
कृष्णाजी त्रिंबक रानडे यांच्या
'ज्ञानप्रकाश' छापखान्यांत छापिलें.

किंमत चार आणे.

पोंच.

कौमुदीमहोत्साह–खंड १.

सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट.

ज्ञानभांडार–अंक १.

आणखी जे वर्गणीदार झाले त्यांचीं नांवें:—

रा० रा० रामचंद्र गणेश मुंडले, पुणें.
,, ,, रामचंद्र नारायण जोगळेकर, पुणें.
,, ,, वामनशास्त्री इसलामपुरकर, सांवतवाडी.
———नेटिव लायब्ररी, चाळीसगांव.
,, ,, त्रिंबक आत्माराम दोंदे, मुंबई.
,, ,, गणेश सखाराम खरे, पुणें.
,, ,, गणपतराव केशव देशमुख, पाथर्डी.
,, ,, महादेव गोपाळ करवंडे, पुणें.
,, ,, अण्णा मार्तंड जोशी, मुंबई.

विषयक्रम.

(१) रसायन शास्त्र. (२) प्रस्तुत विषयाचा विस्तार. (३) पूर्वींचे ग्रंथ. (४) प्रस्तुत ग्रंथाचें साहित्य. (५) मुख्य विषय. (६) भाषापद्धति. (७) स्वतंत्र रचना. (८) प्रयोग व प्रयोगांचें साहित्य. (९) व्यावहारिक उदाहरणें व शिल्पक्रियांची माहिती. (१०) स्थलनिर्देश. (११) उपसंहार.

ता० ३० एप्रिल १८७७.

निबंधमाला.

अंक ३८

रसायनशास्त्र.

अनंतपारं किल शब्दशास्त्रं
स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ।
सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु
हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥ *

१. वरील ग्रंथाची जाहिरात आमच्या पुस्तकांत गेल्या वर्षीं दिली असून तें कांहीं महिन्यापूर्वीं छापून प्रसिद्ध झालें हें आमच्या वाचकांस विदित असेलच. त्याबद्दलची पोंचही नुकती आम्हीं प्रसिद्ध केलीच आहे. या खेपेस सदर्हू ग्रंथावर आम्ही आपला अभिप्राय प्रगट करतों.

२. आतां सदरील ग्रंथाविषयींच खुद्द विचार करण्यापूर्वीं असल्या पुस्तकाच्या संबंधानें सामान्यतः पुष्कळ गोष्टी लिहिण्यासारख्या आहेत. त्या ह्या कीं, युरोपांत अर्वाचीन काळीं सृष्टिविषयक अनेक शास्त्रांचा अपूर्व प्रादुर्भाव होऊन तीं प्रगल्भ दशेश जीं येऊन पोंचलीं आहेत तीं कशामुळें, त्यांपासून पाश्चात्य राष्ट्रांच्या आधुनिक उत्कर्षास कसें साधन झालें, इकडील राष्ट्रांनीं पदार्थविज्ञानसंबंधी आजपर्यंत किती शोध केले, किंवा ते त्यांच्या हातून मुळींच झाले नाहींत, आमच्या देशाच्या प्रस्तुत स्थितीवर वरील शास्त्रांच्या ज्ञानानें कोणकोणतीं कार्यें होण्याचा संभव आहे, इत्यादि. टीकाविषयक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत वरील संबंधाचे कांहीं विचार प्रदर्शित केलेले आहेत. त्यांवर विशेष विस्तार करण्यास व त्यांच्या यथार्थत्वाचें परीक्षण करून इतर संबंधानेंही विवरण कर-

---

* "शास्त्रविस्तार हा फार अवाढव्य आहे; आणि आयुष्य तर अल्पमात्र असून, पुनः विघ्नें शेकडों आहेत. यास्तव सारी विद्या संपादन करण्याच्या भरीस न पडतां सारभूत जेवढा अंश दिसेल तेवढा ग्रहण करून बाकीचें टाकून दे; कीं ज्याप्रमाणें हंस हा क्षीरनीरविभाग करून दुधाचा तेवढा अंश काढून घेतो."

ण्यास पुष्कळ जागा आहे. पण विस्तारभयास्तव व विषयांतराच्या दोषास्तव तसें प्रस्तुत अंकांत करीत नाहीं. यापुढें प्रसंगानुसार त्याविषयींचे आमचे विचार वाचकांस सादर करण्याचा आमचा संकल्प आहे. यास्तव या ठिकाणीं फक्त सदरील ग्रंथाच्या संबंधानेंच जें लिहावयाचें तें लिहितों.

३. महाराष्ट्र भाषेत पदार्थविज्ञानाच्या निरनिराळ्या शास्त्रांवर अद्याप चांगलेसे ग्रंथ झाले नाहींत हें सर्वांस माहीत असेलच. वरील विषयांवर ज्ञान होण्यास आमच्या लोकांस इंग्रेजी पुस्तकांखेरीज इतर साधनें म्हटलीं म्हणजे ज्योतिषादि कांहीं शास्त्रांवर झालेले ग्रंथ, मासिक पुस्तकांतील प्रसंगोपात्त लेख, व सामान्यतः व्याख्यानें वगैरे क्वचित् होणारे प्रसंग, इतकींच कायतीं होत. या सर्वांच्या योगानें पदार्थविज्ञानाचें सामान्य स्वरूप एतद्देशीय लोकांत जे कोणी विशेष बहुश्रुत आहेत त्यांस झालें आहे इतकेंच कायतें म्हणतां येईल. प्रस्तुत रसायन शास्त्राविषयीं जर पाहिलें, तर आजपर्यंत त्यावर प्रसिद्ध ग्रंथ म्हटले म्हणजे कायते दोनच होते. एक इकडील प्रसिद्ध गणिती व आलीकडील नव्या मंडळींपैकीं बहुतेकांस गुरुस्थानीं असलेले रा० रा० केरो लक्ष्मण छत्रे यांचें 'पदार्थविज्ञान;' व दुसरें कैलासवासी डा० नारायण दाजी यांचें 'रसायनशास्त्र'. पहिल्या ग्रंथांत प्रस्तुत विषय केवळ अंशतः आला असल्यामुळें त्याचें विवेचन संक्षेपानेंच केलेलें आहे हें उघड आहे. दुसऱ्याचा कोठें विशेष प्रचार आढळत नाहीं. मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत मात्र मराठी विद्यार्थी त्यावरून रसायनशास्त्राची माहिती करून घेतात असें आम्हांस समजलें आहे. याखेरीज इतर वाचकांच्या हातीं तें पुस्तक जात असेलसें वाटत नाहीं.

४. तेव्हां असल्या विषयावर आमचे मित्र रा० बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं ग्रंथरचना करून आपल्या देशबंधूंस पाश्चात्य शास्त्रविद्येंत प्रविष्ट करून देण्याचा जो हा यत्न त्यांनीं केला आहे तो परम स्तुत्य होय हें सांगायास नकोच. प्रस्तुत ग्रंथकारानें सदरील विषयाचा गेलीं चार पांच वर्षें सतत अभ्यास केला आहे. अनेक ग्रंथांचें साग्र अध्ययन करून, ज्यांस हें पुस्तक नजर केलें आहे अशा विद्वान् युरोपियनांकडून त्यांस सप्रयोग शिक्षणही मिळालेलें आहे. शिवाय ते ज्या कामावर आहेत त्यामुळें तर सदरील विषयाचें निरंतर घाटन करण्याचा त्यांस प्रसंग पडतो. या कारणास्तव नवीन शिकणारांस हा विषय कसा सुबोध करून द्यावा, त्यांस त्यांतील कोणते भाग विशेष मनोरम वाटती-

ल, व व्यवहारदृष्ट्या कोणते विशेष उपयुक्त आहेत, हें सर्व त्यांस अनुभवसिद्ध कळून प्रस्तुत ग्रंथ रचतांना हा अनुभव त्यांस पुष्कळ उपयोगी पडला असेल यांत संशय नाहीं. याखेरीज हेंही वाचकांस कळविण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं, कीं रा० मोडक यांचा पदार्थविज्ञान हा अत्यंत प्रिय विषय असून त्यांनीं त्यावर कोल्हापुरास सार्वजनिक व्याख्यानें दिलीं आहेत. अशा प्रसंगीं पुष्कळ प्रयोग त्यांनीं स्वतः करून साऱ्या लोकांस पाश्चात्य राष्ट्रांच्या विद्याप्रभावाविषयीं विस्मित करून टाकलें. सारांश, प्रस्तुत ग्रंथकारानें प्रकृत विषय आपल्या देशबंधूंस शिकविण्याचा पतकर जो आपणावर घेतला आहे तो केवळ अल्पस्वल्प ज्ञानाच्या जोरावर नसून तो घेण्याची योग्यता त्यांनीं आपले ठायीं चांगली आणली आहे हें वरील माहितीवरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत चांगलें येईल.

५. आतां खुद्द ग्रंथाच्या गुणदोषांविषयीं विचार करावयाचा. प्रथमतः विषयाच्या संबंधानें. या सदरावर प्रस्तुत सारख्या पुस्तकांत फारसें विवेचन करण्यास जागा नसते हें थोडा विचार केला असतां वाचकांस तेव्हांच कळून येणार आहे. प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध केलेल्या प्रमेयांचें जें शास्त्र झालेलें असतें त्याची विवरणरीति प्रायः एकच असते. तींत वादास मुळींच स्थळ न राहून रसाचा प्रादुर्भाव होण्यासही बिलकुल अवकाश नसतो. गणिताच्या कोणत्याही शाखेवर रचलेल्या ग्रंथांत जसे कांहीं नियमित सिद्धांत असायाचे, कीं ज्यांवर शंका घेण्यास अवकाशच राहत नसतो, व जे केवळ बुद्धीनें आकलन करायाचे असतात; त्याप्रमाणेंच रसायनादि सृष्टिविषयक शास्त्रांतील सिद्धांतही अगदीं ठरलेल्या असून त्यांचें विवरण करण्याचा प्रकार एकच असतो. कविता, कादंबरी, इतिहास वगैरे विषयांवरील ग्रंथांवर रसदृष्ट्या युक्तिदृष्ट्या वगैरे जसें विवेचन करण्यास जागा असते, तशी भूमितीच्या किंवा भूगोलाच्या पुस्तकावर असत नाहीं हें उघड आहे. तर या कारणास्तव गुणदोषविवेचनाचें मुख्य स्थान जें ग्रंथविषय तें सोडून देऊन इतर संबंधांनीं सदरील पुस्तकाविषयीं विचार करूं.

६. या बाह्य विचारांपैकीं पहिला अगोदर भाषापद्धतीचा. या संबंधानें सांप्रत पुस्तकास नांव ठेवण्यास बिलकुल जागा नाहीं असें आम्हांस वाटतें. याची भाषासरणी अगदीं सुबोध आहे. विषय जरी इंग्रेजी आहे, व तो प्रौढ असल्यामुळें मोठमोठे संस्कृत शब्द घातले असतां जरी शोभणारें आहे, तरी

घेडगुजरीचा किंवा आढ्यतेचा प्रकार यांत बिलकुल आणला नाहीं. कोणा-हीं सामान्य वाचकास सहज अर्थग्रहण व्हावें अशा तऱ्हेची त्याची रचना केली आहे. आतां एक मात्र आहे कीं, मराठींत प्रस्तुत शास्त्रांतील नांवें अद्याप कोणीही ठरविलीं नसल्यामुळें, साऱ्या पुस्तकभर इंग्रेजी शब्दांची गर्दी दृष्टीस पडते. केवळ मराठी भाषाच समजणारांस वरील परकी शब्द तर अत्यंत दुःश्राव्य होऊन तें त्यांच्या तोंडीं बसण्यासही पुष्कळ श्रम पडतील. त्याप्रमाणेंच 'गुरु कार्ब्युरेटेड हैड्रोजन', 'निर्जल नैत्रिक आसिड' वगैरे व्यभिचारी प्रयोग पाहून वाचकांस हसूं आल्यावांचूनही राहणार नाहीं. पण समंजस वाचक याबद्दलचा दोष ग्रंथकारावर ठेवणार नाहींत हें उघडच आहे. नव्याच विद्याप्रदेशांत प्रथमतः जो वाट काढील त्यास ती सुगम व सुखावह करतां न आली म्हणून दूषण देणें बरोबर नाहीं. जो रस्ता सध्यां बिकट व अडचणीचा वाटतो तोच पुढें पायमळणीनें बराच सुधरेल; किंवा तिकडे रहदारी विशेष वाढली असतां तोच दुरुस्त केला जाऊन तेथें कदाचित् चांगली सडकही होईल!

७. दुसरा विचार प्रकृत ग्रंथाच्या स्वतंत्र रचनेचा. वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं, रा० मोडक यांनीं या विषयावरील अनेक ग्रंथांचें सतत पर्यालोचन करून सदरील पुस्तक तयार केलें आहे. यापूर्वीं शास्त्रीय विषयांवर जे जे ग्रंथ झाले आहेत ते प्रायः भाषांतररूप असत. ही भाषांतराची पद्धत अलीकडे कांहीं कांहीं मोडत चालली आहे; ती अगदीं मोडून स्वातंत्र्यानें ग्रंथरचना करण्याचा प्रचार जेव्हां चोहोंकडे सुरू होईल तेव्हां एतद्देशीय भाषांस जोर येऊन खरी ज्ञानवृद्धि लोकांत होऊं लागेल. नेहेमीं आईच्या कडेवर वागणारें पोर जसें किचकट व किरकिरें होत जातें, पण तेंच जर आपल्या पायांनीं चालू लागेल तर त्याची त्यासच हुशारी वाटायाला लागून तें बळकट होत जाईल; तशीच गोष्ट भाषेची व लोकस्थितीची आहे. तेव्हां प्रस्तुत सारख्या गहन शास्त्रीय विषयावर सदरील ग्रंथकारानें अगदीं स्वतंत्र रचना केली ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय होय. पण हा स्वतंत्रतेचा प्रकार केवळ ग्रंथकर्त्यास भूषणरूप व भाषाभिवृद्धीस अनुकूल म्हणूनच चांगला म्हणायाचा असा अर्थ नाहीं; तर विषयरचनेच्या संबंधानें पाहतांही त्याचें महत्व फार आहे. तें असें कीं, स्वतंत्र ग्रंथ करायाचा म्हटलें म्हणजे विवक्षित विषय ग्रंथकारास पक्केपणीं समजावाच लागतो; तो न समजेल तर त्याची लेख-

णीच चालायाची नाहीं. पण तेंच भाषांतर असलें म्हणजे गोष्ट निराळी पडते. ग्रंथकर्त्याची जबाबदारी मजकुरावरची तेव्हांच उडून फक्त भाषेच्या संबंधानेंच कायती त्याची मालकी राहते. शिवाय देशभाषेंत एकाद्या विषयावर नवाच ग्रंथ करायाचा असला म्हणजे तो लोकस्थितीच्या अनुरोधानें लिहावा लागतो; म्हणजे वाचकांचा त्यांत कोणत्या रीतीनें अत्यंत सुलभ प्रवेश होईल, व कोणत्या प्रकारांनीं त्यांच्या मनावर तो उत्तम ठसेल, हें पाहावें लागतें. अशा दृष्टीनें भाषांतररूप ग्रंथ तर फारच थोड्या योग्यतेचा ठरेल.

८. सदरील पुस्तकांत दोनशांवर प्रयोग दिलेले आहेत, व त्यांची कृति नीट लक्षांत येण्याकरितां सुमारें शंभर सवाशें आकृति ग्रंथाच्या शेवटीं जोडल्या आहेत. या प्रयोगांस कोणकोणतें सामान लागेल त्याची ही याद किंमतीसकट सरतें शेवटीं दाखल केली आहे. ग्रंथकाराचे हातून वरील साऱ्या प्रयोगांच्या कृति अनेक वेळां साक्षात् होऊन गेलेल्या आहेत, यास्तव वरील सर्व सोई त्यास अनायासानें करून ठेवतां आल्या. असें करण्यांत दोन तीन हेतु आहेत. एक तर प्रस्तावनेंत सांगितलाच आहे कीं, एतद्देशीय शाळांतून प्रस्तुत विषय जसा चालावा तसा चालत नाहीं, यास्तव प्रस्तुत पुस्तकाच्या साहाय्यानें तो चांगल्या तऱ्हेनें शिकवितां यावा. दुसरा असा आहे कीं, कोणा हौसदार विद्यार्थ्यास या शास्त्राची चट लागून स्वतः प्रयोग करण्याची जर इच्छा झाली, तर ती ही शंभर सवाशें रुपयांत त्यास पुरवतां येऊन मौजची मौज व माहितीची माहिती अशीं दोन्ही त्यास करून घेतां येतील. तिसरा उपयोग ही लौकिक संबंधाचा एक फार मोठा करून घेतां येणार आहे. तो असा कीं, मोठमोठ्या शहरांतून वरील सामग्री जर आणून ठेवली, व पदार्थसंग्रहालयांतून पंचवीस प्रकारच्या शिंपा व पन्नास प्रकारचे शंख वगैरे जें सामान ठेवलें असतें त्याच्या जागीं वरील प्रयोगाची सिद्धता करून ठेवलेली जर असली तर लोकशिक्षणाचा एक उत्तम मार्ग स्थापित केलासा होईल. असल्या कृत्यास जो खर्च लागेल तो वसूल होण्याची पंचाईत पडेल असेंही वाटत नाहीं. लोकांस अद्भुत चमत्कार पाहण्याची जात्या हौस असतेंच, यास्तव ती पुरविण्यास सहज लोकाश्रय मिळण्याचा संभव आहे.

९. आतां प्रस्तुत ग्रंथाच्या एका गुणाविषयीं मात्र उल्लेख करायाचा राहिला आहे. तो हा कीं, त्यांस जेथें जेथें अवकाश सांपडला तेथें तेथें व्यवहारिक उदाहरणें देऊन पुष्कळ यांत्रिक व्यापारांची माहितीही प्रसंगवशात्

दिलेली आहे. असें केल्याच्या योगानें दोन गोष्टी झाल्या आहेत. एक तर प्रकृत विषय वाचकांस सामान्यतः अपरिचित वाटण्यासारखा असल्यामुळें, व तो स्वरूपतःच काहीं अंशीं रूक्ष असल्यामुळें, व्यवहारिक गोष्टींचा संबंध मधें मधें आल्यानें त्यास सुबोधता येऊन तो विशेष चित्तवेधकही झाला आहे. वस्तुतः पाहतां असला विषय साक्षात् प्रयोगदर्शनानेंच विद्यार्थ्यांच्या मनावर ठसावयाचा व त्यांस गोड लागावयाचा; पण तशी अनकूळता किती थोड्यांस असणार? सामान्य वाचक जे असला ग्रंथ वाचणार ते अर्थातच इतर पुस्तकाप्रमाणें केवळ मौजेखातर व विषयाची साधारण माहिती होण्याकरितां वाचणार. त्यांजपाशीं रसायन सामग्री कोठली? व आहे असें जरी कल्पिलें तरी येवढी खटपट कोण करीत बसतो? यास्तव मुख्य विषयाच्या अनुरोधानें व्यावहारिक गोष्टींचा संबंध सदरील पुस्तकांत वरचेवर आणला आहे ही चांगली योजना होय. दुसरें असें कीं, आलीकडे आमच्या लोकांचें देशी माल उत्पन्न करण्याकडे बरेंच लक्ष लागत चाललें आहे. आजपर्यंत ज्या त्या गोष्टींत सरकारावर टेंकण्याची जी त्यांस संवय लागली होती ती सोडून देण्याचें त्यांस भाग पडत चाललें आहे. व उत्तरोत्तर तर 'आपल्या बळें बांधावी कास, आणि कोणाची करूं नये आस' या म्हणीसच सर्वथा धरून चालण्याचें त्यांस अगत्य पडणार असा सुमार दिसतो. तर अशा स्थितींत प्रस्तुतसारख्या पुस्तकांत नुसतें शास्त्रीय विवेचन नसून व्यवहारोपयोगी अशा भिन्न भिन्न कलांच्या कृति व त्यांचे व्यापार यांविषयीं सविस्तर माहिती दिलेली आहे हें वाचकांस पसंत होईल यांत संशय नाहीं.

१०. आतां वरील उल्लेखाच्या उदाहरणार्थ सदहू ग्रंथांतील कित्येक स्थलें दाखवितों. ही अवतरण रूपानें संपूर्ण दिलीं असतां अतिशयितच विस्तार होईल, यास्तव त्यांचा निर्देश मात्र येथें करतों. त्यांवरून सदरील पुस्तकाच्या रचनेविषयीं वाचकांस बरीच कल्पना झाल्याशिवाय राहणार नाहीं.

रसायनाचा सृष्टिविषयक बहुत्येक शास्त्रांशीं थोडा बहुत संबंध आहेच आहे. यास्तव प्रसंगवशात् त्यांविषयीं प्रस्तुत ग्रंथांत बरेच लेख आढळतात. उदाहरणार्थ—

पृष्ठ १९३. यांत बाष्पोद्भवनादि व्यापारांचें निरूपण केलें आहे. नंतर 'पाणी' या सदराखालीं 'पर्जन्योदक,' 'झऱ्याचें उदक,' 'पाण्यांतील क्षारांचें प्रमाण काढण्याची रीति,' 'नदीचें उदक,' 'खनिजोदक,' 'समुद्राचें पाणी,' अशा निरनिराळ्या विभागांचें विवरण केलें आहे.

पृष्ठ १२९. यांत हिऱ्याचें स्वरूप व धर्म हे सांगून त्यापुढें पृथ्वीतील अत्यंत नामांकित जे 'कोहिनूर' वगैरे हिरे त्यांविषयीं माहिती दिली आहे. नंतर लकडी पेनसिलीचा दगड, व दगडी लांकडी लोखंडी वगैरे कोळशांच्या जाती, यांविषयीं पुष्कळ तऱ्हेची सविस्तर माहिती दाखल केली आहे.

पृष्ठ १४९. यांत कार्बानिक आसिड वायूविषयीं विवेचन चाललें असतां वारा मोकळा खेळेल अशा तजविजीनें घरें बांधणें हें आरोग्यास किती अनकूळ होय, वनस्पति व प्राणी यांचें श्वासोच्छ्वसन परस्परांस कसें हितावह आहे, तुळशीच्या झाडांत कोणता अपूर्व गुण असतो वगैरे आगंतुक विषयांवर पुष्कळ विवरण केलें आहे, व कित्येक अत्यंत महत्वाच्या सूचना करून ठेवल्या आहेत.

पृष्ठ १६९–१७०. यांत वातावरणाचा विषय असून हवेचे घटक जे निरनिराळे वायु त्यांच्या संबंधानें पुष्कळ अवांतर माहिती दिलेली आहे.

आतां व्यवहारोपयोगी ज्ञान या पुस्तकापासून जें होणारें आहे त्याचे मासले दाखवितों.

प्रयोग ९३,९४. यांत गुळाची पांढरी साखर करण्याच्या दोन तीन रीति सांगितल्या आहेत.

पृष्ठ १३८. यांत फिल्टर म्हणजे पाणी स्वच्छ व शुद्ध करण्याचें यंत्र कसें तयार करावें तें सांगितलें आहे.

पृष्ठ २११–२१४. यांत कापड पांढरें शुभ्र कसें करावें, व निरनिराळ्या रंगांचें बुट्टीदार कापड विलायतेंत जें तयार करतात तें कसें करतात हें सर्व सांगितलें आहे.

प्रयोग १३३, १३४. यांत कांचेवर नक्षीचें काम करण्याचा प्रकार दिलेला आहे.

पृष्ठ १३९ यांत रेशमी लोकरी वगैरे वस्त्रांस रंगहीन म्हणजे शुभ्र करण्याची रीत सांगितली आहे.

पृष्ठ २४९–५० टीप. हींत फोटोग्राफीविषयीं माहिती आहे; म्हणजे सूर्य किरणांच्या योगानें हुबेहुब तजबीर कशी उठते तो प्रकार समजून सांगितला आहे.

प्रयोग १६३,१६४ यांत आगकाड्या करण्याची कृति सांगितली आहे. पहिल्या प्रयोगानें आवाज न होणाऱ्या काड्या तयार होतात, दुसऱ्यानें आवाज होऊन पेटणाऱ्या तयार करतां येतात.

पृष्ठ २७०–२७४. यांत कांचेविषयीं निरूपण केलें आहे. प्रथम सामान्यतः तिचें वर्णन असून नंतर 'खिडक्यांची कांच', 'शिशांची कांच', 'बोहिमियन ग्लास', 'गारेची कांच', व रंगित कांच' इतक्या तऱ्हांविषयीं मजकूर आहे.

आतां प्रस्तुत पुस्तकांतले कांहीं चमत्कारिक प्रयोग दाखवितों. त्यांचें वर्णन वाचतांनाही वाचकांस चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं; मग ते प्रत्यक्ष पाहिले असतां किती मौज वाटेल याची कल्पना वाचकांनींच करावी!—

पाण्यावर जाळ———प्रयोग ८
पाण्यांत जाळ———प्रयोग १९
लोखंडावर तांबें चढविणें———प्रयोग २५
लोखंड जाळणें———प्रयोग ३१
साबणाचे बुडबुडे———प्रयोग ३७
विमान——————प्रयोग ३८
दारू बत्तीशिवाय बंदुकीसारखा बार———प्रयोग ४०
रसायन संगीत———प्रयोग ४३
पाण्याचें विद्युत्प्रवाहाच्या योगानें पृथक्करण———प्रयोग ११४
वायुसंयोगजन्य पाणी———प्रयोग ११२
पाण्याच्या गोठण्यानें लोखंडाचें भांडें फुटणें———प्रयोग ९०
उत्कृष्ट कारंजें——————प्रयोग ९९
आग्या वेताळ——————प्रयोग १५९
पाण्यावर आगीच्या लाटा———प्रयोग १६०

११. इतका निर्देश पुरे आहे. येवढ्यावरून टीकाविषयक पुस्तक कोणत्या तऱ्हेचें रचलें आहे याचा कोणासही बराच अजमास करतां येईल. तसेंच वर त्याची जी तारीफ केली आहे ती केवळ 'मित्रनिष्ठे'च्या भरांत केली नाहीं याविषयींही बहुधा खात्री होईल. आमच्या देशांत विद्या वाढण्यास व एतद्देशीय भाषांचा उत्कर्ष होण्यास काय झालें पाहिजे याविषयीं सदरील पुस्तकावरून आम्हांस एक कल्पना सुचते, ती ही येथें प्रसंगवशात् लिहिल्यावांचून राहवत नाहीं. ती ही कीं, सध्यांच्या शिक्षणपद्धतीनें 'वेश्यानामिव विद्यानां मुखं कैःकैर्न चुंबितम्' हा प्रकार होऊन विद्याभ्यास म्हणजे नेमक्या टप्प्यावर ओझें नेऊन पोंचविणाऱ्या हमालाचें काम अशी जी स्थिति झालेली

आहे, त्यापेक्षां ज्यास ज्या विद्येची हौस वाटेल व जिकडे ज्याचा जात्याच कल असेल तिकडे व्यासंग करायास जर प्रत्येक जण मोकळा होईल तर आमच्या सरकारचा एतद्देशीयांस विद्यादान करण्यांत जो वास्तविक हेतु आहे तो विशेष सफल होणार आहे. असो; पण हा सरकारचा विचार आहे; व त्याविषयीं विवेचन करण्याची ही जागाही नव्हे. यास्तव सरते शेवटीं आमच्या नव्या मंडळीस येवढीच सूचना करून आटपितों कीं, रा० मोडक यांचा या कामीं कित्ता उचलून एकेकजण आपापला काळ एकेका विषयाकडे किंवा कांहीं विवक्षित विषयांकडेच घालविण्याचा जर संकल्प करील, व आपापल्या व्यासंगाचें फळ कालांतरानें आपल्या देशबंधूंस सादर करण्याचें जर मनांत आणील, तर आजपर्यंतच्या अभिश्रापापासून ते मुक्त होतील, व देशभाषेचें कल्याण होऊन आजपर्यंत पाश्चात्य विद्या केवळ पांडित्य करण्यांतच जी प्रगट होत होती ती क्रियाद्वारा फलद्रूप होत्साती साऱ्या देशभर प्रगट होईल!*

साहित्य—(हें एक नवें सदर या वर्षापासून जोडण्याचा विचार केला आहे. साहित्य म्हणजे काव्यविवेचन होय. या शास्त्रावर संस्कृतांत पुष्कळ मोठमोठे ग्रंथ लिहिलेले आहेत. पण मराठींत एक दोन लहान पुस्तकांखेरीज याविषयीं साधारण माहिती होण्याचेंही साधन अद्याप झालें नाहीं. यास्तव ती थोडीबहुत होण्याकरितां या सदराखालीं मराठी कवितेंतील उतारे दिले जातील. वर अलंकारादिकांचें लक्षण लिहून खालीं त्यांचें उदाहरण असा क्रम चालायाचा आहे. या लेखांत प्रकृत शास्त्रीय विषयाचें पद्धतवार निरूपण करायाचें आहे असें नाहीं. त्याचा उद्देश इतकाच आहे कीं, साहित्यशास्त्राचें कांहीं ज्ञान वाचकांस व्हावें; व महाराष्ट्र कवींच्या वाग्रत्नांचा कांहीं संग्रह या पुस्तकांत होऊन त्यांकडे रसिकांचें व शोधकांचें लक्ष लागावें. प्रस्तुत महत्वाच्या विषयावर इतःपर कोणी सविस्तर ग्रंथरचना करण्याचें मनांत आणल्यास त्यास ही प्रस्तुत लेखाचा प्रसंगवशात् कांहीं उपयोग होईल असें वाटतें.)

अलंकारशास्त्र हें साहित्याचा एक भाग होय. अलंकारांत दोन प्रकार

---

* प्रस्तुत ग्रंथकाराचा पदार्थविज्ञानावरही एक ग्रंथ तयार झालेला आहे. तो लवकरच छापून प्रसिद्ध करण्याची त्याची उमेद आहे. याशिवाय दक्षिणेंतील प्रांतांच्या प्राचीन इतिहासासंबंधी माहिती पुष्कळ जमा करून महाराष्ट्र देशाचा प्राचीन इतिहास त्यांनीं आलीकडे लिहावयास घेतला आहे. हाही कांहीं दिवसांनीं कदाचित् प्रसिद्ध होईल.

आहेत; एक शब्दालंकार आणि दुसरा अर्थालंकार. आतां प्रथमतः पहिला प्रकार घेऊं.

प्रास.

हा शब्दालंकाराचा एक प्रकार आहे. एकाच अक्षरसमुदायाची अनेकवार आवृत्ति झाली असतां तेथें वरील अलंकार होतो. जसें:—

फिरवितें रवितें दधिभीतरीं । मिरवितें रवितेज नगांवरी ॥
स्वकरिं तें करि चंचलता मनीं । उपरमे परमेश्वरगायनीं[1] ॥

वामन.

वाजत गाजत साजत आज तया जतन करुनि आणा हो ।
मजमागें मत्स्यांचा हा रिपुशशिराहुबाहु राणा हो[2] ॥

मोरोपंत.

हो सुप्रसन्न मति हा अनानें जन निज न निमग्न नरकीं हो ।
अमर नव्हे पशु हि नव्हे मी त्वदुदरजान्वयोत्थ नर कीं हो[3] ॥

मोरोपंत.

सेवुनि संतत पाला संत तपाला यदर्थ करितात ।
तो प्रिय या स्तवना कीं यास्तव नाकीं हि तेंचि वरितात[4] ॥

मोरोपंत.

अवतरला उतराया जो दुःसह दुष्टभार महिवरला ।
अहिवरलास्यपटु प्रभु करुणोक्तें द्वारकेंत गहिवरला[5] ॥

मोरोपंत.

---

(१) वरील पद्य दधिमंथनांतील असून तें यशोदावर्णनपर आहे हें सर्वप्रसिद्ध आहेच.

(२) ही आर्या विराटपर्वांतील होय. उत्तर बृहन्नडेबरोबर विजयी होत्साता माघारी आला असतां विराटराजा हर्षित होऊन आपल्या सचिवांस वरील आज्ञा करीत आहे.

(३) ही आर्या वनपर्वांतली आहे. अर्जुन आपल्या बापाच्या कचेरींत असतां उर्वशीनें त्याजपाशीं काय प्रार्थना केली ती सर्वप्रसिद्धच आहे. ते समयीं उद्वेग पावून अर्जुन तिची उलट विनवणी करीत आहे.

(४) ही एक स्फुट आर्या ईश्वरपर आहे.

(५) द्रौपदीनें धांवा केला त्या प्रसंगींची वरील आर्या आहे.

वित्त पाहतां पित्त येतसें वित्त पाहिजे मला ।
असें हरि म्हणतो नुमजे तुलीं ॥

रामजोशी.

अनुप्रास.

जेथें एकाच अक्षराची साऱ्या पद्यभर आवृत्ति झालेली असते, किंवा एक अथवा अनेक वर्ण अनियमितपणानें पुनः पुनः आलेले असतात तेथें वरील अलंकार होतो. जसें:—

कड्यावरूनियां उड्या प्रथम टाकुनी त्या गड्या
गडे पशुप भेटती तटतटां भुजीं आंगड्या ।
फुगोनि तनु फाटती मणगटीं कडीं दाटती
सुखें अमित वाटती विरहसिंधु ते आटती[1] ॥

वामन.

छायानायकसा निदाघसमयीं छाया करी तो विधू
वांया या हृदया श्रमासि करितो दायादसा हा मधू ।
जाया जे रुचली मनीं तिजकडे जाया नये कीं पहा
रायाला न गमे न जाय रजनी आयास होती महा[2] ॥

रघुनाथ पंडित.

तूं समर करुनि न नर भ्रमरसम रघूत्तमांघ्रिनवपद्मीं ।
रम रस घे अमराचे हो भ्रमरहित स्वस्थ नांद निजसद्मीं[3] ॥

मोरोपंत.

---

(६) लावणींतला एक चुटका आहे.

(१) वरील श्लोक कालियमर्दनाच्या शेवटीं आहे.

(२) नलराजाच्या विरहावस्थेचें वर्णन.

(३) वरील आर्या मंत्ररामायणांतील आहे. अंगद रावणास रामाचा निरोप सांगून पुढें त्यास आपण होऊन उपदेश करीत आहे.

पीतां मरंद उदरंभर भ्रमरांचें । जें होय मंदिर हि सुंदर इंदिरेचें ॥
जें पद्म तेथिल सहस्रदळां धरीतें । प्रत्यक्ष सूर्यकिरणांस विसांववीतें [४]॥

रघुनाथ पंडित.

तेथें ज्ञानविशारद शारदशशिगौर गौरवार्ह कवी ।
दुस्तर भवाब्धिपारद नारद येउनि सुनीतिला शिकवी [५] ॥

मोरोपंत.

तो शर गरधरवरसा पविसा रविसा स्मरारिसायकसा ।
पार्थ भुजांतरिं शिरला वल्मीकामाजि नागनायकसा ॥

मोरोपंत.

हांसोनि म्हणे हरिसख हो गादासन विकंपधी धीट ।
न धरीं बा दर हा दर सादर दे वाजवूं पुन्हा नीटं ॥

मोरोपंत.

यमक.

पद्याच्या चरणांतीं एक किंवा अधिक अक्षरें जीं सारखीं जुळलेलीं असतात त्यांस यमक म्हणतात. उदाहरणें:—

ईश्वरें तुज दिली नरकाया । साधनें करिशि तूं नरका या ।
भोगिशी निशिदिनीं विषयातें । मानिशी न मनिं तूं विष यातें [७]॥

वामन.

---

(४) नलाच्या उपवनाचें वर्णन.

(५) मयानें सभा निर्माण करून पांच पांडव इंद्रप्रस्थांत मोठ्या ऐश्वर्यानें राहत असतां नारद येऊन त्यानें धर्मास राजधर्म सांगितले आहेत. त्या वेळची वरील आर्या आहे.

(६) कर्ण हा पृथ्वीनें गिळलेलें रथाचें चाक उपटीत असतां शरप्रहार करणाऱ्या अर्जुनास क्षत्रियधर्माची आठवण देत होता, कीं विशस्त्र झालेल्या शत्रूवर प्रहार करूं नये. पण कृष्णानें पांडवांचा कैवार घेऊन त्याचा जेव्हां निषेध केला, तेव्हां कर्ण हा मुकाट्यानें रथावर चढून त्यानें मोठ्या रागानें अर्जुनावर एक बाण सोडिला. त्याचा वेग व तेज वरील आर्येंत वर्णिलीं आहेत.

(७) अर्जुन भ्यालेल्या उत्तरास म्हणतो आहे.

(९) वैराग्यपर स्फुट श्लोक.

सदानंद जो सर्वदा मोदराशी । तया भेटवीं आजि दामोदराशीं ।
जयावीण कोणींच खेदा न वारी । त्वरें आणि वो तो सखे दानवारी[२] ।।

वामन.

भुजीं कंचुकी फाटताहे तडाडां । करीं कंकणें फूटती हीं कडाडां ।।
पुढें होउनी तत्करांभोरुहातें । उरोजीं धरी गाढ रंभोरु हातें[३] ।।

वामन.

परीक्षिता मग शरासन पांडवानें । ओढूनियां हुतवहार्पितखांडवानें ।
तो भीष्मदेह खचिला शरतांडवानें । ज्याच्या क्रिये सकल पद्मभवांड वानें[४] ।।

वामन.

असुर म्हणति विद्येनें प्रबळ करायासि देव या नीचें ।
मन मोहिलें गुरूचें गुरुचित्ताहूनि देवयानीचें[५] ।।

मोरोपंत.

आराधिला कचें गुरु गुरुची कन्याहि देवयानी ती ।
झाली प्रसन्न सत्वर शिकविति तैशीच देव या नीती[६] ।।

मोरोपंत.

भक्तीं जसा मदात्मा देहीं हि तसा न दारुका रमला ।
या विजयवेदवचना द्यावा लागे सदा रुकार मला[७] ।।

मोरोपंत

---

(२) (३) हे श्लोक 'राधाभुजंग' नामक प्रकरणांतील आहेत. पहिल्यांत राधा आपल्या दूतीस कृष्णाकडे जाण्यास प्रार्थीत आहे; दुसऱ्यांत कृष्ण आल्यावरचें वर्णन आहे.

(४) याचा प्रसंग सर्वांस माहीत असेलच.

(५) (६) या आर्यांचा संदर्भ सांगण्याची गरज नाहीं.

(७) (८) (९) दारुक हा कृष्णाचा सारथि होता. वरील कृष्णाचे उद्गार जयद्रथवधाची ज्या दिवशीं अर्जुनानें प्रतिज्ञा केली होती त्या रात्रीं प्रगट झालेले होत. अर्जुनास निद्रा लागून कृष्ण व दारुक हे दोघे चिंतातुर होत्साते जागत होते. वरील आर्या सर्वजनप्रिय आहेत.

निजरक्षणाधिक ध्वज–रक्षण राजासि दारुका पडतें ।
मोलें राजशिराहूनि बहु असतें काय दारु कापड तें[८] ॥

मोरोपंत.

प्राकृत हि लुब्ध जातां पदरींचा एकदा रुकाहि मरे ।
सर्व हि पदार्थ तापद मज भक्तचि एक दारुका हिम रे[९] ॥

मोरोपंत.

रविला झांकी गगनीं कुरुगुरु बहु शर भरी तिमिर विखरी ।
लीलेनें नरकेशरि–लक्ष चिरी शरभरीति मिरवि खरी[१०] ॥

मोरोपंत

आर्येला मानियलें बहु पाहुनि सज्जनीं चमत्कृतिला ।
खळचि न मानिति तैसें बहु दूषणसज्ज नीच मत्कृतिला[११] ॥

मोरोपंत.

जेणें ताप दिला तो हा कामी तापसा हतांस दया ।
उठवि तुझी किति मारूं हाका मी ताप साहतां सदया[१२] ॥

मोरोपंत.

भवद्वन करित होता बहुभास्वर थावरूनि हात रणीं ।
वाटे जणों उतरला बहुधा स्वरथावरूनि हा तरणी[१३] ॥

मोरोपंत.

---

(१०) द्रोण सेनानी असतां त्याच्या पराक्रमाचें वर्णन.

(११) वरील आर्या सभापर्वांतील आहे. द्रौपदीची विटंबना करण्याचा यत्न विफल झाला असतां व वस्त्रपरंपरेचा अद्भुत चमत्कार सर्वांनीं पाहिला असतां सज्जन व दुर्जन यांस कसकसें वाटलें तें कवि सांगतो. यांतच आपल्या कवितेच्या दूषकांचाही संबंध कवीनें खुबीनें घालून दिला आहे. 'आर्या' व 'चमत्कृति' हे शब्द द्व्यर्थी आहेत हें मार्मिकांस तेव्हांच कळणार आहे.

(१२) ही आर्या ययात्याख्यानांतली आहे. ययाति जराव्यथित झाला असतां अनुतापपूर्वक आपल्या सासऱ्यास विनवीत आहे.

(१३) ही आर्या स्त्रीपर्वांतील आहे. पांडव व साऱ्या भारतस्त्रिया हीं गंगातटीं तिलांजलिदानार्थ गेलीं असतां कुंती कर्णाचें नातें आपल्या पुत्रांपाशीं प्रगट करीत आहे.

भाषापरिज्ञान——(अर्थांतर)—'प्रहर'–या शब्दाचा मूळ यौगिक अर्थ 'ठोका' हा होय. पूर्वी या देशांत धनिकांच्या घरोघर वेळ कळविण्यास पहारेकरी ठेवलेले असत. त्यांनीं दिवसां सूर्याच्या गतीवरून व रात्रीं नक्षत्रांवरून वेळेचें मान ठेवावें, व एक प्रहर झाला म्हणजे घड्याळावर टोला देऊन सर्वांस वेळ कळवावी. याप्रमाणें मूळचा अर्थ 'टोला' इतकाच असतां पुढें लवकरच दोन 'प्रहरां'चें अंतर जो तीन तासांचा वेळ त्या अर्थीं वरील शब्दाची प्रवृत्ति पडली असावी. इंग्रेजी शब्द watch (वॉच्) या शब्दाचीं अर्थांतरें वरच्याप्रमाणेंच झालीं आहेत; व मराठी शब्द 'पहारा' याची उपपत्तिही वरील व्याख्येवरून ध्यानांत येईल.

'घटका'——हा शब्दही वरच्याप्रमाणेंच अर्थांतरसिद्ध व ऐतिहासिक होय. 'घटिका' हें 'घटी' या स्त्रीलिंगी शब्दास स्वार्थी 'क' प्रत्यय होऊन रूप झालेलें आहे. याचा मूळचा अर्थ 'लहान घडा' असा होय. पुढें कालमापनार्थ जेव्हां त्याची योजना होऊं लागली तेव्हां मूळ अर्थांत फेर होऊन सध्यांचा रूढ अर्थ प्रचारांत आला. 'घट' व 'घटी' या संस्कृत शब्दांचे मराठींत जे अपभ्रंश झाले आहेत त्यांतही मूळचा अर्थभेद तसाच राहिला आहे. पाहिल्याचा अपभ्रंश 'घडा' हा 'मडक्या'चा वाचक आहे; आणि 'घडी' या शब्दांत वस्तुतः तोच अर्थ असतां रूढार्थ 'घटका' असा कालांशवाचक झाला आहे. 'घड्याळ' व 'सुगड' हे शब्द अनुक्रमेंकरून 'घट्यालय' व 'सुघट' यांचे अपभ्रंश होत हें सहज ध्यानांत येणारें आहे.

'यजमान'———या शब्दाचा मूळ व यौगिक अर्थ 'यज्ञ करणारा' असा होय. या अर्थाचे शब्द संस्कृतांत अनेक आहेत; 'अध्वर्यु' 'ऋत्विज्' 'होता' इत्यादि. पण हे सर्व समानार्थक नव्हेत. 'यजमान' म्हणजे जो यज्ञदीक्षा घेऊन आपल्या घरीं यज्ञ करवितो तो; व सारें याज्ञिक* चालविणारे जे भट त्यांस वरील संज्ञा त्यांच्या त्यांच्या नियुक्त कर्माप्रमाणें दिलेल्या असतात. असो; तर प्रस्तुत शब्दाचा मूळ अर्थ वर सांगितला इतकाच होय. पण कालांतरानें तो 'धनी' या शब्दाप्रमाणें स्वामित्ववाचक झाला. यज्ञांत यजमान व यज-

* यज्ञकर्म हें मोठ्या प्रयासाचें व गानगडीचें काम आहे हें सर्वांस माहीत असेलच. त्यांतील मंत्र तंत्र अगदीं बेचूक व्हावें लागतें, यास्तव एकेका कर्मावर एकेकाची योजना केलेली असते. वर जे अनेक याज्ञिक सांगितले ते अशा प्रकारचे होत. लोकभाषेंतही सहागोंपींच्या उत्यास 'याज्ञिक' म्हणतात हें प्रसिद्धच आहे.

मानपत्नी हीं दोघेंही लागतात, यावरून पाहिला शब्द 'नवरा' या अर्थी प्रथमतः रूढ झाला. नंतर सामान्यतः स्वामित्वाचा वाचक होऊन सेवकांच्या संबंधानेंही तो प्रचारांत आला.

'छांदस'——या शब्दाचा मूळ अर्थ 'वैदिक' म्हणजे 'वेदसंबंधी' असा आहे; 'छंदस' म्हणजे 'वेद.' प्रस्तुत शब्द हा विशेषण असून त्याचा मूळ प्रयोग व्याकरणांतला होय. **पाणिनी**च्याही वेळेस वेदांतील प्रयोग जुने होऊन गेले होते; ते चालू भाषेतल्यांहून पुष्कळ निराळे होते. म्हणजे सध्यांच्या मराठी भाषेला व 'ज्ञानेश्वरी'ला जितकें अंतर आहे, किंवा चालू इंग्रेजी व **चासर**चे ग्रंथ यांत जितकी तफावत आहे, तितकीच 'अष्टाध्यायी' च्या वेळची भाषा व वेदभाषा यांत भिन्नता आढळते.* या भेदास्तव भाषेतले प्रयोग व छंदांतले प्रयोग यांविषयीं पार्थक्येंकरून विवेचन केलेलें जेथें तेथें आढळतें. तर याप्रमाणें लोकभाषेत न आढळणारा प्रयोग आढळला कीं, त्यास 'छांदस' ('वेदांतला') अशी संज्ञा देण्याचा पूर्वापार पाठ चालत आला आहे. यावरूनच पुढें होतां होतां 'छांदस' हें विशेषण शब्दांकडून मनुष्यांकडे येऊन 'छांदिष्ट,' 'विक्षिप्त,' 'तऱ्हेवाईक' अशा अर्थावर येऊन बसलें.

'आर्ष'——या शब्दाची तऱ्हा वरच्यासारखीच आहे. याचा मूळचा अर्थ 'ऋषिसंबंधी' असा आहे. 'आर्ष' प्रयोग म्हणजे ऋषींनीं 'निरंकुशाः कवयः' हा आपला अधिकार गाजवून अपाणिनीय प्रयोग जे बेलाशक ढकलून दिले असतात तें होत. आतां वरील विशेषणाचा अर्थांतरीं कसा प्रयोग होतो तो सर्वांस माहीत असेलच. तो असा, "असा आर्ष मनुष्य कधीं नाहीं पाहिला बोवा! सकाळीं उठला कीं, अंथरुणावरच वीस पंचवीस कांकड्या करकरां चावायाच्या; जेवायाच्या वेळेस तर जें बकाबका चाललें असतें तें कांहीं पुसूं नये. एकंदर करणीच बाबाची अवीट!"

'अर्वाच्य'——या शब्दाचा यौगिक अर्थ 'आधुनिक' 'अलीकडील' असा आहे. याच विशेषणाचें दुसरें रूप 'अर्वाचीन' असें आहे. तेव्हां जें 'पुरातन,' 'प्राचीन' नव्हे तें 'अर्वाच्य' होय. कोणत्याही गोष्टीस प्राचीनत्वेंकरून मान येत असतो, व अर्वाचीनत्व हें प्रायः तिरस्कारास कारण

---

* 'ज्ञानेश्वरी'त ज्याप्रमाणें 'जाणिजे,' 'अर्थु' वगैरे अप्रसिद्ध प्रयोग आढळतात त्याप्रमाणेंच वेदांत 'देवासः' (देवाः), देवेभिः (देवैः), कर्तवे (कर्तुम्) इत्यादि रूपें दृष्टीस पडतात.

होतें हें सर्वांस माहीत आहेच. तर यावरून ' अर्वाच्य ' म्हणजे ' तिरस्कारास्पद ' असा अर्थ प्रथमतः झाला. मराठींत प्रस्तुत शब्दाचा अर्थ 'बीभत्स', ' अनर्गल ' अशा प्रकारचा झाला आहे. जसें, एकाद्यानें सभ्य लोकांच्या समाजांत यथेच्छ जल्पना केली असतां म्हणतात, " काय अर्वाच्य मनुष्य आहे हो हा ! याला बोलण्याचा बिलकुल सुमार नाहीं. तोंडास येईल ती बडबड करतो ! "

' व्रात्य '———या शब्दाचेंही अर्थांतर वरील तिहींप्रमाणेंच मोठें विचित्र झालें आहे. याची व्युत्पत्ति पाहिली तर समूहार्थक जो ' व्रात ' शब्द त्याला संबंधवाचक ' य ' प्रत्यय लागून तो सिद्ध झाला आहे. त्याचा मूळ अर्थ ' समूहांत वाढलेला ', ' संस्कारहीन ' असा आहे; म्हणजे ज्या मुलाचे जातकर्मादि संस्कार मुळीं कोणतेच न होतां तसाच जो वाढलेला असतो त्याची वरील संज्ञा होय.* पण मराठींत प्रस्तुत शब्द विशेषण होऊन त्याचा अर्थ ' द्वाड ', ' खोडकर ' असा बनलेला आहे; व तो पोरांसच लागतो. जसें, " असलें व्रात्य कारटें आहे तें काय सांगूं ! दररोज एक कज्या घरांत घेऊन येतें ! "

शा० शा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि०. आपल्या देशामध्यें एकमेकांचा द्वेष वाढत चालल्यापासून सर्वांची दुर्दशा होत जाऊन शेवटीं आपण अशा स्थितीस येऊन पोहोंचलों. याकरितां मागील द्वेषभाव जे कांहीं असतील ते नाहींतसे होऊन सर्वांचें ऐक्य जमवून आणण्याच्या कामीं होईल तितका प्रयत्न सर्वांहीं केला पाहिजे, असें सर्व जाणत्या लोकांचें मत असतां, भलतेंच एकादें नवीन खुसपट काढून उगीच द्वेष वाढविण्याच्या कामीं लागणें हें फार अयोग्य होय. तशांत आपल्या सारख्या शोधक, विद्वान्, समजुतदार गृहस्थांनीं तर असें करणें फारच अयोग्य. म्हणून, आपल्या गेल्या म्हणजे ३६ व्या (डिसेंबर १८७६ च्या)

---

* पंडितरायांनीं ' गंगालहरी 'त म्हटलें आहेः—

भवत्या हि व्रात्याधमपतितपाखंडपरिषत्—
परित्राणस्नेहः श्लथयितुमशक्यः खलु यथा ।
ममाप्येवं प्रेमा दुरितनिवहेष्वंब जगति
स्वभावोऽयं सर्वैरपि खलु यतो दुष्परिहरः ॥

अंकामध्यें २२ व्या पृष्ठावर जें एक आपण विलक्षण वाक्य लिहिलें आहे, तें पाहून मला फारच सखेदाश्चर्य वाटलें. तें वाक्य—

"याचे (सत्यदीपिका पत्राचे) वर्गणीदार पाहिले तर ते अर्थातच भाविक युरोपियन, धर्मांतर झालेले लोक, व हिंदुधर्माच्या अज्ञानास्तव त्याची टवाळी केलेली ज्यांस आवडते असे परभू शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीनजातीचे लोक हेच आढळतात."

या मधील सत्यदीपिकेच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही विषयाच्या संबंधानें बोलण्याची मला तादृश गरज नाहीं. पण त्यामध्यें "शेणवी वगैरे व त्यांच्याहूनही हीन जातीचे लोक" असे जे आपले शब्द आहेत त्यांविषयीं आपली थोडीशी कान उघाडी करावी असें माझ्या मनांत आहे. कित्येक लोक असे आहेत कीं, ते 'आम्ही जातिभेद मानित नाहीं, जातिभेदांत काय आहे?' अशा प्रकारें बोलण्याचा डौल घालून यथेच्छ खाण्यापिण्याच्या वेळीं काम चालवून नेतात. पण तेवढी वेळ गेली म्हणजे पुनः ते सर्व विसरून एकंदरीनें आपली जाति श्रेष्ठ आणि परकी 'हीन' जातीचे, अशी घडघडीत आढ्यता मिरवितात, आणि त्यांविषयीं कोणी बोलण्यांत पकडल्यास, "असे आम्ही सहज बोललों हो, त्याचा राग मानण्याची तुम्हांला कांहीं गरज नव्हती. ब्राम्हणांतच काय विशेष आहे?" इत्यादि प्रकारें कशी तरी टाळाटाळ करतात. जे खरोखरी जातिभेद मानित नाहींत, त्यांना 'हीनजाति' किंवा श्रेष्ठजाति हे शब्द योजण्याचाच अधिकार नाहीं. म्हणून त्यांहीं तसें केल्यास, त्यांना ढोंगी, मतलबी, म्हटल्यावांचून कोणी राहत नाहीं. पण अंतःकरणापासून ज्यांची जातिभेदाविषयीं श्रद्धा आहे त्यांची गोष्ट वेगळी. आपापल्या माहितीप्रमाणें ते दुसऱ्यांस उच्चनीचपणा देतात. तथापि त्यांमधून ज्यांना विद्वान्, शोधक, इत्यादि शब्दांचा अभिमान आहे, ते आपल्याच अनुभवावरून जातिभेद हा मोठा नाजूक विषय आहे हें जाणत असतांही, त्यांसंबंधी पुरी माहिती काढून घेतल्यावांचून त्यांहीं उगीच वेडेपणानें किंवा द्वेषभावानें भलत्यालाच 'उच्च' आणि भलत्यालाच 'हीन' असे शब्द लाविले, तर परिणाम वाईट होतो, आणि त्यांच्याविषयींची पूज्यबुद्धि नष्ट होते.

"शेणवी वगैरे व त्यांच्याहूनही हीन जातीचे लोक" या वाक्यावरून व विशेषतः त्यांतील "ही" या शब्दावरून शेणवी हेही हीन जातीचे लोक, असा आपला मतलब स्पष्ट होतो. पण आपणास मी कळवितों कीं, शेणवीही वेगळी

ज्ञाते असा जरी कदाचित् आपला समज असला, तरी 'हीन जातीचे' असे शब्द आधारपूर्वक त्यांना लावण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य नाहीं. फार विस्तार होऊंनये म्हणून आपणांस थोडक्यांत कळवितों कीं, आपले सजातीय बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे, ज्यांच्या आश्रयाला शेंकडो मोठमोठे शास्त्री आणि ज्ञाते हिंदुधर्माभिमानी होते, त्यांहीं आपण म्हटल्याप्रमाणें शेणव्यांना 'हीन जातीचे' असें न म्हणतां, रामचंद्र बाबा शेणवई यांस काहीं जमीन इनाम देते वेळीं सनदेमध्यें "रामचंद्र मल्हार सुखटणकर गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन सारस्वत गौड" असे शब्द योजले आहेत. व त्या सनदे-प्रमाणें अद्यापि जमीन त्याचे वंशज खुद्द तुमच्या पुण्यामध्येंच राहणारे अनुभवित आहेत. दुसरें,—त्याच नानासाहेबांनीं स्मार्त शेणव्यांचे जगद्गुरु (तुमचे जे देशस्थ शंकराचार्य, त्यांचा शेणव्यांवर अधिकार नाहीं. शेणव्यांचे मुख्य स्मार्तमठ दोन आणि वैष्णवमठ दोन आहेत.) संन्यासी (ब्राम्हणांशिवाय इतर जातींत संन्यासी नसतात हें आपणास माहित आहेच.) यांच्या निरनिराळ्या मठांचा खर्च चालविण्याकरितां दक्षिण महाराष्ट्रामध्यें काहीं गांव इनाम दिले होते. त्यांच्या सनदा लुटारू लोकांच्या दंग्यामुळें गेल्या असतां त्यांचे चिरंजीव थोरले माधवराव पेशवे, यांणीं प्रख्यात रामशास्त्री बोवांच्या कारकीर्दींत, सनदा पुनः नवीन करून देऊन स्वामीला फार मोठेपणा देऊन शिष्यांतर्गत माधवराव बल्लाळ प्रधान असें लिहून साष्टांग नमस्कारादि नम्र भाषणांनीं प्रणिपात करून, स्वामीच्या आशीर्वादें यथास्थित असों असें म्हणून, यजनयाजनादि षट्कर्में स्वामीच्या मठांत चालतात त्याच्या खर्चाकरितां व भिक्षेकरितां हे गांव दिले आहेत असें स्पष्ट लिहिलें आहे. त्याप्रमाणें ते गांव अद्यापि इंग्रेजी अम्मलामध्येंही स्वामीकडे चालत आहेत. यावरून ज्या वेळीं पुण्यामध्यें मोठमोठे विद्वान् होते, त्यावेळीं त्यांचें शेणव्यांविषयीं काय मत होतें हें स्पष्ट लक्षांत येतें. म्हणून अधिक उदाहरणें देत नाहीं. सांप्रतकाळचे, गत राजाराम शास्त्री कालेंकर, बाळशास्त्री रानडे, बापूदेवशास्त्री, विठ्ठलशास्त्री, आपल्याच उपनामाचे चिपळूणकर बापूशास्त्री इत्यादि काशी क्षेत्रांतील शेंकडो विद्वान् पंडितांचें मत आपल्या निबंधमालेंतील मताच्या केवळ विरुद्ध आहे. तुमच्याच पुण्यांतील गोपीनाथशास्त्री आगाशे, रघुनाथशास्त्री पर्वते वगैरे अनेक सर्वमान्य शास्त्री मंडळाचें मत निबंधमालेच्या विरुद्ध आहे. पुण्यांतील ओंकारेश्वराचे देवळासमीप नदीकाठीं जी स्मशानभूमि आहे तेथें पूर्वींपासून केवळ

ब्राह्मणांच्याच प्रेताचे दहन होतें, हीन जातीचें होत नाहीं. पण शेणव्यांच्या प्रेतांचाही संस्कार तेथेंच होतो, हें आपणांस माहित असेलच. अनेक स्मृति-ग्रंथांमध्यें जातिनिर्णय आहेत, पण त्यांमध्यें शेणव्यांना ' हीनजाति ' म्हणणारा एकही ग्रंथ नाहीं. जातिनिर्णय करणारे कमलाकरभट्टादि ग्रंथकार तर त्यांना हीनजाति न म्हणतां उलट त्यांचें गौडब्राम्हणत्व निर्विवाद मान्य करतात. शेणव्यांचा द्वेष्टा जो जातिमाधव नांवाचा ग्रंथकार त्याचा ' शतप्रश्नकल्पलतिका ' म्हणून जो ग्रंथ त्यामध्यें चितपावनांविषयीं लिहितांना जरी तो त्यांना--

नीताःसागरमध्यस्थैर्म्लेंच्छैर्बर्बरकादिभिः ।
बहून्यब्दान्यतीतानि तेभ्यो जाताच संततिः ।
तत्संपर्काच्च संपातात्तद्रूपाः पुत्रपौत्रकाः ।

इत्यादि प्रकारें दोष देतो, तरी शेणव्यांविषयीं लिहितांना आरंभीं " अथ जातिमाधवे गौडजात्यंतरमाह " असा प्रस्ताव करून---

गौडदेशेऽवसन् विप्राः श्रुतिस्मृतिपरायणाः ।
इष्टापूर्तादिकर्तारः षट्कर्मनिरताः सदा ।

इत्यादि लिहून पुढें महाभारतांतर्गत गदापर्वांतील सारस्वत द्विजांची त्याणें कथा संक्षेपानें दिली आहे. आणि दुर्भिक्षाच्या वेळेस सरस्वतीतीरीं मत्स्याच्या योगानें यज्ञयागादि क्रिया चालवून वेदांचें रक्षण केलें ते हे शेणवी असें लिहिलें आहे. जातिमाधव हा तुमच्या चितपावनांचा आवडता ग्रंथ हें येथें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.---सह्याद्रिखंड नामक ग्रंथामध्येंही शेणव्यांची स्तुतीच आहे.

यांत विशेष सांगायाचें असें कीं, स्वतः शेणव्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांचा मीं येथें उल्लेख करीत नाहीं, कांकीं तेणेंकरून पक्षपात वाटेल. केवळ परक्यांनींच खरें मानिलेल्या ग्रंथाचे मीं दाखले दिले आहेत. या व दुसऱ्या अनेक ग्रंथांमध्यें कित्येक अगदीं वेडगळ व अप्रयोजक निराधार भाकडकथा असल्यामुळें त्यांतील सर्वच लेख प्रशस्त म्हणतां येत नाहींत. तथापि परक्यांनीं आणि विशेषतः द्वेष्ट्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांमध्यें जें आपल्या तर्फेचें असेल त्याच्या साक्षीचें महत्व मोठें आहे.

अमरादि कोणत्याही कोशांत हीनजातींमध्यें शेणव्यांना धरिलें नाहीं.

योगशास्त्रामध्यें 'शेणवी' हा शब्द बुद्धि किंवा ज्ञान याचा वाचक घेतला आहे असें म्हणतात.

आतां लोक विचारानें जर म्हटलें तर शेणव्यांना 'हीनजाति' हा शब्द अगदीं लागूं शकत नाहीं. पहा त्यांना असा कांहीं खरा अभिमान आहे कीं, त्यांच्यामध्यें आजपर्यंत कोणीही दामोदरपंती दुष्ट कर्म केलें नाहीं. पूर्वींपासून शेणवी हे अत्यंत विश्वासू, म्हणूनच शिवाजी महाराजांपासून अझूनपर्यंत गंगोमंगाजी व नारोराम याचे वंशज अष्टप्रधानांमध्यें छत्रपतींचे खासगी कामाकडे मंत्री पदवी भोगीत आहेत. रामचंद्र मल्हार यांणीं तर थोरले नानासाहेब यांच्या राज्याचा पाया स्थिर करून पेशवाई भरभराटीस आणली. आणि आपल्या अंत:काळीं आपल्या पुत्रालाही न जुमानितां आपली कोटयावधी रुपयांची दौलत पेशव्यांस दिली. हिंदुस्थानामध्यें शिंदांचें राज्य वाढविण्याला तर लखोबा लाड, जिवबा दादा इत्यादि राज्यधुरंधर पुरुषच सर्वस्वी कारण होते. आणि खरड्याच्या लढाईचें सर्व यश पेशव्यांनीं जिवबादादांना देऊन, आम्ही केवळ स्वस्थ असून मोठेपणा घेतला, असें म्हणून दाखविलें हें आपणांस माहित आहेच. शेणवी आप्पाजीराम हा हैदर अल्लीचा कारभारी असे तोंपर्यंत त्याच्या राज्याचा भरभराट चालला होता. पुढें टिप्पूनें त्यास कैद करून मीरसादत यास कारभार दिला न दिला इतक्यांत मीरसादत याणें फितूर होऊन राज्याचें वाटोळें केलें. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील, परंतु विस्तारभयास्तव देत नाहीं.

शेणव्यामध्यें हलकी चाकरी करणारे, आणि विशेषेंकरून स्वयंपाकादि नीच कामें करणारे मिळण्याची मोठी अडचण पडते. सदा भ्रष्ट अशा ज्या वेश्या, त्यांच्या गृहीं नीच कर्मे करणारे, त्यांचीं लुगडीं धुणारे, त्यांच्या घरीं देवपूजा किंवा स्वयंपाक करणारे शेणवी तर प्रतिज्ञेस मिळणार नाहींत. हात पाय सबळ असून पोटासाठीं भीक मागणें या कर्माचा शेणव्यांना मोठा तिरस्कार आहे. नीच जातीपासून कधीं ते दान घेणार नाहींत. दहीं दूध इत्यादि गोरसांची ते विकरी करणार नाहींत. नरमांस (कन्या) विक्रयरूप महापातकाचा ते पराकाष्ठेचा तिरस्कार करितात. मुंबईसारख्या बकाल शहरामध्यें ही ज्या स्थळाला चेष्टेनें मुक्तद्वार म्हणतात, अशा फणसवाडी इत्यादि वेश्यासमुदायस्थानांच्या ऐन मध्यभागीं मुंग्यांच्या वारुळाप्रमाणें भरलेल्या चाळीमध्यें

सहकुटुंब राहणें, व 'घणों घोटाळो' असे शब्द लावून घेणें त्यांना फार नीचकर्म वाटतें. खाणावळीच्या मिषानें घातलेलीं शरीरविक्रयाचीं दुकानें त्यांच्यामध्यें मिळणें कठीण पडेल. द्वेष्टयांनाही ते सदा ममतेनेंच वागवितात. दारीं आल्यास त्यांचा धिक्कार करीत नाहींत. हातून होण्याजोगें असल्यास त्यांचें कल्याणच करतील. देववेल तितका त्यांना आश्रय देतील; हें आपण मुंबईत असणाऱ्या आपल्या कोणी मित्रास पुसल्यास सहज समजेल.

असें असतां आपण शेणव्यांना 'हीनजाति' असा शब्द लाविला! केवढा हा उन्माद! वर सांगितलेल्या शेणव्यांच्या गुणांपैकीं कितीकसे गुण तुमच्या श्रेष्ठ म्हणविणाऱ्या जातीमध्यें आहेत याचा आपण विचार करावा; आणि मग शेणवी 'हीनजाति' किंवा दुसरे कोणी 'हीनजाति' याचा निर्णय करावा. मला परक्या जातीची निंदा आवडत नाहीं म्हणून प्रस्तुत विषय सोडून पलीकडे मी फारसा जात नाहीं.

सत्यदीपिकेवर राग काढण्याच्या भरामध्यें वेळ मारून नेण्याकरितां जर आपण शेणव्यांना हीनजाति म्हटलें असेल, तर तेंही अप्रशस्त. स० दी० चे वर्गणीदार झाल्यानें 'हीनपणा' किंवा आपल्या निबंधमालेचे वर्गणीदार झाल्यानें श्रेष्ठपणा येतो अशा समजुती केवळ हास्यास्पद होत. त्या आपल्यासारख्या विद्वानांस शोभत नाहींत. तसेंच जे कोणी शेणवी स० दी० चे वर्गणीदार असतील, ते "हिंदुधर्माच्या अज्ञानास्तव त्यांची टवाळी केलेली ज्यांस आवडते असे" आहेत, किंवा निबंधमालेचे त्याच्या विरुद्ध म्हणजे हिंदुधर्माचे ज्ञाते आणि श्रद्धाळु आहेत असें म्हणणें हेंही अत्यंत वेडेपण होय. तसेंच स० दी० चे वर्गणीदार, आपण वरिष्ठ मानिलेल्यांपैकीं कोणी नाहींतच, असेंही आपल्याच्यानें म्हणवणार नाहीं. म्हणून आपल्या वाक्यांतील "हेच आढळतात" हे शब्द केवळ व्यर्थ व अज्ञानसूचक आहेत. तुमच्यापैकीं जे स० दी० चे वर्गणीदार असतील त्यांना आपण दूषण लावित नाहीं, हाही एक मोठा पक्षपात आपला घडला आहे, त्याकडे लक्ष द्यावें.

एकंदरीनें पाहतां जो हा आपण वेडगळ लेख लिहिला आहे, तो आपल्या नावास, किंवा विद्वत्तेस किंवा समजुतीस बिलकुल शोभत नाहीं, हें पाहून मला फार वाईट वाटतें.

कदाचित् आपणांस शेणवी म्हणजे कोण, कोठचे, कसे, हें माहित नसल्यामुळें, आपल्या हातून लिहिण्यामध्यें चूक घडली असेल, नसेल असें म्हणवत

नाहीं. तथापि पुनः असें होऊं नये, व विनाकारण दुसऱ्यांचीं मनें आपण दुखवूं नयेत अशी आपणांस विनंती आहे. तसेंच जे कोणी आपणांसारखेच गैरमाहित असतील, त्यांनाही या विषयाची कांहीं माहिती व्हावी, म्हणून हें पत्र समग्र आपल्या येत्या अंकामध्यें छापण्याची अवश्य मेहेरबानी करावी. पत्रविस्ताराची माफी असावी हे विनंती.

मुक्काम मुंबई ता० ३ मार्च १८७७.

आपला सेवक

मकरंद.

रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि०. आपल्या मालेच्या डिसेंबरच्या अंकांत बाविसाव्या पानावर सत्यदीपिकेच्याविषयीं लिहितांना आपण असें लिहिलें आहेः—

"याचे वर्गणीदार पाहिले तर ते अर्थातच भावीक युरोपियन, धर्मांतर झालेले लोक, व हिंदुधर्माच्या अज्ञानास्तव त्याची टवाळी केलेली जांस आवडते असे परभू, शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीन जातीचे लोक हेच आढळतात." याचा अर्थ बरोबर ध्यानांत येत नाहीं यास्तव आपल्या दुसऱ्या अंकांत याचा खुलासा कराल तर बरें होईल. मनांत ज्या शंका येतात त्या अशा. आपल्या लिहिण्याच्या झोंकावरून अज्ञान लोक काय ते परभू शेणवी वगैरे यांत मात्र असतात, चित्पावन, कऱ्हाडे, देशस्थादि ब्राम्हणांत नसतात असा आपला ग्रह आहे असें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं. प्रत्येक देशांत व प्रत्येक लोकांत सज्ञान व अज्ञान लोक असतात व असलेच पाहिजेत या नियमाकडे आपलें दुर्लक्ष कसें झालें हें समजत नाहीं.

दुसरें. "शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीन जातीचे लोक" असें लिहीत असतां शेणवी यांजला अति हीन जातीच्या लोकांपेक्षां जरासे वरच्या पायरीवर बसविले आहेत. महाराष्ट्र देशांत ज्यांना शेणवी ब्राम्हण असें म्हणतात ते दशविध ब्राम्हणांपैकीं सारस्वत ब्राम्हण असून उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र मान्य आहेत, व या महाराष्ट्र देशांत अनेक प्रसंगीं तंटे उपस्थित होऊन यांच्या ब्राम्हण्याविषयीं शतशः निर्णय झाले आहेत ही गोष्ट आपणास माहीत नाहीं असें वाटतें. सातार मुक्कामीं शाहू छत्रपतीच्या कारकिर्दींत महादेवभट आठले प्रभृति मंडळीनें परभू प्रकरण उपस्थित केलें होतें त्या वेळीं काशीपासून

रामेश्वरपर्यंत मोठमोठाले पंडित जमून शेणवी ज्ञातीविषयीं ठराव झाला आहे तो पाहावा म्हणजे भ्रांतीचें निरसन होईल. माहितीशिवाय कोणतीही गोष्ट लिहिली तर उपहास मात्र होतो.

सदरील लागट मजकूर आपल्या हातून सहजवृत्या लिहिला गेल्यास ती गोष्ट निराळी, परंतु बुद्धिपुरःसर लिहिला असल्यास त्याचा खुलासा करणें आपणास उचित होय. येत्या अंकांत या पत्रास कृपा करून जागा द्याल या आशेनें लिहीत आहें.

मुक्काम मुंबई, ता० १० माहे मार्च सन १८७७.

कोंकण्या.

वर आमच्या दोघा शेणवी बंधूंकडून जीं पत्रें आलीं आहेत तीं पाहून आम्हांस एकंदरीनें मोठा संतोष होतो. त्यांत आम्हांवर व आमच्या सजातीयांवर जरी बरेच आक्षेप केले आहेत, तरी पाश्चात्य विद्येनें सुप्रकाशित झालेल्या नव्या मंडळींत जी अभिमानशून्यता पूर्ण बाणलेली सामान्यतः दृष्टीस पडते तिजशीं ताडून पाहतां वरील कडाकाही आम्हांस पुरवतो. ज्या विद्येच्या संसर्गानें युरोपांत देशाभिमानास स्फुरण चढतें व सदसद्विवेचनशक्ति प्रखर होऊन ज्ञानौत्सुक्यादि वृत्ति प्रबळ होतात, तिचाच प्रभाव इकडे कृतकृत्यताबुद्धि, आलस्य, गर्व इत्यादि प्रकारें दृष्टीस पडून स्वदेशप्रकरणीं अत्यंत औदासीन्य हें बुद्धीच्या परिपक्वतेचें लक्षण मानलें जातें, ही आलीकडील स्थिति ज्यानें पूर्णपणें लक्षांत आणली असेल, त्यास जातिनिर्णयासारख्या प्रसंगींही आवेशाचा आविर्भाव पाहून चित्तास खेद होईल असें आम्हांस वाटत नाहीं. सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या राष्ट्रांस आपल्या पायतणांचीही बेअदबी झालेली जर खपत नाहीं, व रूक्ष प्रदेशास रूक्ष म्हटल्यानेंही चिरड येते, तर यांहून फार महत्वाच्या प्रकरणीं वेळेनुसार तब्बेत जरा गरम झाल्यास आमच्यांतील अत्यंत प्रचंड विद्वानांसही शरम वाटण्याची विशेष जरूर नाहीं हें उघड आहे!

तर याप्रमाणें विचार करतां वरील दोन लेख जरी बरेच कडक आहेत, तरी ते आम्हांस अमान्य आहेत असें नाहीं. आपल्या जातीची किंवा देशाची निंदा विनाकारण केलेली पाहून किंवा ऐकूनही जो केवळ निर्विकार राहतो तो जसा शहाणा होत नाहीं, त्याचप्रमाणें वरच्यासारख्या प्रसंगीं कोणी

तापटपणा दाखविला असतां त्यासही असमंजस म्हणणें बरोबर नाहीं. आपली वास्तविक योग्यता जो खालीं करूं पाहील त्याजवर प्रतीकार करणें हें सर्वांस उचितच होय. आणि तसें केलें असतां जो समंजस व समबुद्धि आहे त्यास राग येण्याचेंही कारण नाहीं. असो; तर याच बुद्धीनें वरील दोन पत्रांस आम्हीं स्थळ देऊन आतां त्यांवर आम्हीं आपलें मत कळवितों.

प्रस्तुत पत्रकारांनीं दोघांनींही आम्हांस विचारलें आहे कीं, सदरील अंकांतील वादविषयक वाक्य आम्ही द्वेषभावानें लिहिलें आहे कीं काय? या प्रश्नाचें उत्तर फार विस्तारानें देण्याची बहुधा गरज नाहीं असें आम्हांस वाटतें. कां कीं, यापूर्वींचा तीन वर्षांचा क्रम जे लक्षांत आणतील त्यांची या गोष्टीविषयीं बहुत करून खात्री असेल, कीं आमच्या देशबंधूंत आपआपसांत कलागत लावावी अशा प्रकारचा आमचा बिलकुल उद्देश नाहीं. 'मकरंदा'नीं पत्रारंभीं जें म्हटलें आहे, कीं भांडण्याच्या पायीं आज या देशास इतकी विपन्नतेची स्थिति येऊन पोंचली आहे, व सर्व सुज्ञ लोकांचा यत्न हें बखेडे मोडण्याविषयीं सतत चालू असावा, तें आम्हांस सर्वांशीं मान्य आहे. आम्हीं यापूर्वीं अनेक वेळां वाचकांस कळविलेंच आहे कीं, आमचा पुस्तककर्त्यांच्या नात्यानें जगाशीं जो शत्रुमित्रत्व संबंध आहे तो केवळ सत्य व स्वदेशप्रीति या दोहोंच्या संबंधानेंच काय तो आहे; म्हणजे आपल्या जन्मभूमीचा योग्य अभिमान असून ज्यांस सत्य आवडतें ते आमचे मित्र, व स्वदेशाची टवाळी करण्यांत ज्यांस भूषण वाटतें व जे असत्यास जाणून बुजून भजतात किंवा त्याच्या निरसनाविषयीं अनास्था प्रगट करतात ते आमचे द्वेष्य. याखेरीज इतर संबंध आम्ही कोणतेही ओळखीत नाहीं.

आतां वादाच्या मुख्य विषयावर आमचे विचार काय आहेत ते वाचकांस कळवितों. वादास्पद वाक्य कोठलें आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस आठवतच असेल. गेल्या डिसेंबरच्या अंकांत 'सत्यदीपिका' या सदराखालीं आरंभीच तें आहे:—

"या पुस्तकाचे वर्गणीदार पाहिले तर ते अर्थांतच भाविक युरोयन, धर्मांतर झालेले लोक, व हिंदुधर्माच्या अज्ञानास्तव त्याची टवाळी केलेली ज्यांस आवडते असे परभू शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीन जातीचे लोक हेच आढळतात." या वाक्यांत 'ही' या पदेंकरून परभू व शेणवी यांची जात ब्राम्हणांच्याहून खालची असा जो गर्भितार्थ निघतो तो

वरील पत्रकारांस न आवडून ते असें सिद्ध करूं पाहत आहेत कीं, ब्राम्हणांचें उच्चत्व मानण्यास कोणत्याही रीतीनें पाहिलें असतां आधार नाहीं. प्राचीन ग्रंथांवरून पाहतां गौड ब्राम्हणांचे अधिकार इतराप्रमाणेंच आढळतात, व अर्वाचीन काळींही त्यांची पायरी ब्राम्हणांच्या बरोबर असल्याविषयीं अनेक प्रमाणे आहेत. पण हेंहीं एकीकडे ठेविलें तरी एकंदर वर्तनावरून पाहतां शेणवी व परभू हेच ब्राम्हणांहून श्रेष्ठ ठरतील. वरील दोन्ही पत्रांतील सारांश येणेंप्रमाणें आहे.

आतां हा जो वाद प्रस्तुत पत्रांवरून उपस्थित होणारा आहे त्यावर विस्तार करण्याची किंवा तो होऊं देण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं. कां कीं, एक तर असले वाद प्राग: शुष्क व अनर्थावह मात्र होत; व शिवाय त्यांविषयींचा ऊहापोह मासिक पुस्तकांत शोभत नाहीं. आजपर्यंत शेंकडो वेळां असले जातिप्रकरणीं कलह उपस्थित होऊन पुष्कळ भवति न भवति झाली आहे, व अद्यापही प्रसंगोपात तसला प्रकार पुन्हा सुरू झाल्याचें केव्हां केव्हां ऐकूं येतें. तेव्हां शेंकडो वर्षें धुमसत आलेला जो तंटा, कीं जो यापूर्वी मोठमोठ्या प्रसंगीं ही मिटला नाहीं, तो यापुढें नाहींसा होण्याचा मुळींच संभव दिसत नाहीं. आतां हें खरें कीं, प्रस्तुत वाद कसाही असला, तरी त्या संबंधानें आपले विचार प्रगट करण्यास सर्वांस मोकळीक आहे; व त्यांतून प्रमाणयुक्त व समर्पक असा थोडक्यांत लिहिलेला एकादा लेख असला तर दोहों पक्षांच्या प्रांजल लोकांस तो मान्य झाल्याशिवाय राहणार नाहीं. 'मकरंद' या पत्राचा पूर्वार्द्ध अशा तऱ्हेचा आहे, व यास्तव आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस तो बहुधा पसंत होईल असें वाटतें.

सदरील वादावर अनेक ग्रंथ आजपर्यंत लिहिले गेले असतील, परंतु त्यांपैकीं आम्हीं अद्याप एकही पाहिला नाहीं; तशींच 'मकरंदां'नीं आपल्या तर्फेनें जीं प्रमाणें पुढें केलीं आहेत तींही सारीं आम्हांस माहीत नव्हतीं. आमच्या वाचकांपैकींही पुष्कळांस तीं बहुधा नवींच वाटण्यासारखीं आहेत, यास्तव पत्रकर्त्यांच्या सूचनेप्रमाणें तीं त्यांस सादर केलीं आहेत. आतां अशी गोष्ट असतांही आम्ही आमच्या पत्रकारांच्या सजातीयांवर बळेंच हीनत्व कां स्थापित केलें अशी जर कोणी शंका घेईल, तर तिजवर आमचें सामान्यत: असें उत्तर आहे कीं, परभू व शेणवी यांस ब्राम्हणांहून कमी मानण्याचा जो आजपर्यंत संप्रदाय चालत आला आहे व जो सर्वसंमत आहे त्यासच अनुसरून वरील

उल्लेख केला आहे. भर पेशवाईंत मोठमोठया शास्त्रीपंडितांच्या अनुमतानें जरी वरील लोकांचे धर्माधिकार कदाचित् सर्वसंमत झाले असतील, तरी ज्या अर्थी पुनर्विवाहविषयक प्रसिद्ध शास्त्रार्थाप्रमाणें ते पुढें चालले नाहींत, त्या अर्थी सध्यांचा आढळणारा प्रकार यथावत् लिहिण्यास कोणताही बाध दिसत नाहीं. याखेरीज अमेध्याहार हा जातिभ्रंशाचें एक मोठें कारण आहे हें सर्वप्रसिद्धच आहे.

तर आमच्या पत्रकर्त्यांच्या जातिबांधवांस ब्राम्हणांहून खालची पदवी जी आम्हीं दिली आहे तिचीं कारणें वरील होत. त्यांच्या निर्देशावरून सहज लक्षांत येईल कीं, सदरील उल्लेख करण्यांत आमचा कांहीं वाईट मतलब होता असें नाहीं, तर आम्हांस जी गोष्ट तथ्य वाटली ती आम्हीं लिहिली. जाणून बुजून आमच्या देशबंधूंची मानहानि करावी असा आमचा उद्देश नाहीं; व कोणाची खरी स्थिति व वास्तविक योग्यता प्रगट केल्यानें त्याची मानखंडना होते असेंही पण आम्हांस वाटत नाहीं.

पण हा सर्व वाद वस्तुतः पाहतां केवळ गौण आहे. वादविषयक वाक्यांत प्रस्तुत पत्रकर्त्यांच्या बंधूंवर जो मुख्य आक्षेप केला आहे, त्याचा दोघांनींही विचार केला नाहीं. हा मूळ मुद्दा असा आहे कीं, परभू व शेणवी यांच्यांतलेच वर्गणीदार ‘ सत्यदीपिके ’सारख्या हिंदुधर्मनिंदक पत्रांचे फार करून आढळतात; व याचें कारण एक तर स्वधर्माचें अज्ञान व दुसरें कारण त्याची विटंबना करण्याची व करून घेण्याची हौस ही होय. आपली जात ब्राम्हणांच्या बरोबरीची नाहीं असें कोणी म्हटलें असतां तें जर आमच्या बंधूंस बिलकुल खपत नाहीं, तर तुमचे पूर्वज महामूर्ख व महापातकी होते अशी जे आज वर्षांचीं वर्षे बडबड करीत आहेत त्यांचा तर त्यांस किती राग यावा ! पण हा प्रकार पाहूं गेलें असतां उलटा मात्र दृष्टीस पडतो. ‘ ज्ञानोदय’, ‘ सत्यदीपिका ’ वगैरेंचे कर्ते जें पवित्रज्ञान आजतागाईत आमच्या देशांत ओतीत आहेत त्याविषयीं ‘ मकरंदा ’चे बंधु केवळ उदासीनच राहतात असें नाहीं. तर एतद्देशीय धर्माचें विटंबन हें जणूं काय मोठें पुण्यकर्मच आहे अशा समजुतीनें वरील पत्रांस त्यांचा आश्रय बराच भरपूर दृष्टीस पडतो. याखेरीज त्यांचीं सामान्यतः मतें पाहतांही तीं इंग्रेजी कलाचींच आढळण्यांत यात. पारशी लोकांस हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांचें अनुकरण करण्यांत जसें मोठें भूषण वाटतें, व त्यांचे आचारविचार दिवसेंदिवस इंग्रेजी नमुन्याचे होत चालले आहेत, त्याप्रमाणेंच परभू शेणवी यांचाही मासला बराच दृष्टीस पडतो.

आतां स्वदेशनिष्ठेत ते इतरांहून उणे आहेत असें आमचें म्हणणें नाहीं; पण धर्माच्या प्रकरणीं यांचीं मतें सामान्यतः भकलेलीं दृष्टीस पडतात. एकाद्या मिशनरीनें किंवा बाव्यानें आपल्या पवित्र शास्त्रावर पांडित्य आरंभिलें असतां तें आमच्या सजातीयांवर जितकें ठसेल त्याच्यापेक्षां वरील लोकांवर त्याचा प्रभाव अधिक गाजेल यांत संशय नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं, स्वधर्मप्रकरणीं माहिती यांची तितपतच असते. याविषयीं प्रमाण फार मोठें पाहयाला नको. स्वभाषेच्या ज्ञानावरूनच वरील गोष्ट सहज लक्षांत येईल. वर जें 'मकरंदां'नीं पत्र लिहिलें आहे तितपत तर काय, पण नुसतीं दोन पानेंही मराठींत शुद्ध लिहिण्याची शक्ति त्यांच्या बंधूंपैकीं कितीकांचे ठायीं आढळेल? मग स्वदेशाच्या भाषेविषयीं ज्यांची इतकी अनास्था त्यांस तींत असणारे जे स्वधर्मविषयक ग्रंथ त्यांचें ज्ञान कितपत असावें हें कोणासही सहज कळेल.

याप्रमाणें वरील दोन पत्रांविषयीं एकंदरींत विचार झाला. आतां सरते शेवटीं आमच्या बंधूंस व सर्वांस येवढेंच कळविणें आहे कीं, आम्ही कोणावि- षयींही द्वेषभावानें व मत्सरानें न लिहिण्याविषयीं यत्न करीत आहोंच, त्याप्रमाणें बहुधा आमच्या वाचकांच्याही प्रत्ययास येत असेल. कोणाविषयीं यथार्थ उल्लेख केला असतां तो मात्र वरील वृत्तीस वश होऊन केला आहे असें कोणी समजूं नये. आपल्या मनास निःपक्षपात बुद्धीनें जें वाटेल तें प्रांजळपणानें जो लिहूं लागेल याचे अभिप्राय सर्वांस आवडण्यासारखे निघतील असें नाहीं हें स्पष्टच आहे. तर हेंच ध्यानांत ठेऊन आमच्या 'मकरंद' प्रभृति दे- शबंधूनीं आमच्या पुस्तकाविषयीं अन्यथा कल्पना मनांत आणूं नये. त्यां- च्यांत जे जे श्लाघ्य गुण आहेत ते आम्हांस मान्य नाहींत असें नाहीं. राम- चंद्रबाबा शेणवी, जिऊबादादा बक्षी इत्यादि इतिहासप्रसिद्ध विख्यात पुरुषांची कीर्ति त्यांच्या सजातीयांस जशी अत्यंत प्रिय आहे त्याहून ती आम्हांस कमी आहे असें नाहीं. तसेंच आलीकडेही वरील दोन ज्ञातींतले जे जे पुरुष नामांकित होऊन गेले व सध्यां स्वदेशास भूषित करीत आहेत त्यांसही प्रत्येक देशाभिमानी पुरुषाप्रमाणें आम्ही चाहत आहोंच. परंतु ईश्वरी नियमाप्रमाणें कोण- ताही मनुष्य, जाति किंवा राष्ट्र हीं सर्वथा दोषशून्य असत नाहींत; यास्तव प्र- संगानुसार दोषाचा उल्लेख करणें अवश्य येतेंच. तर हें अपरिहार्य समजून सुज्ञ जनांनीं त्याबद्दल यथार्थ निरूपण करणारावर व्यर्थ टपका ठेवूं नये.

पत्रें.

राशींच्या उत्पत्तीविषयीं.

रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि०. पुढें लिहिलेली उपयुक्त माहिती महाराष्ट्र लोकांचे उपयोगाकरितां छापून प्रसिद्ध करण्याची कृपा करावी.

आपल्या लोकांस मेषादि १२ राशीच कायत्या माहित आहेत, परंतु ज्यांनीं इंग्रजी ज्योतिष ग्रंथांचें अध्ययन केलें आहे त्यांस एकंदर १०९ राशी* (तारका पुंज) आहेत ही गोष्ट सूर्याचे उगवण्याप्रमाणें अगदीं परिचितशी वाटते. या १०९ राशींपैकीं ५० जुन्या व ५९ नव्या म्हणजे अर्वाचीन ज्योतिष्यांनीं कल्पिलेल्या आहेत. जुन्या पन्नास राशी कोणी कल्पिल्या याविषयीं मोठा वाद आहे. व त्यापैकीं क्रांतिवृतस्थ ज्या मेषादि बारा राशी त्यांचीं नांवें ग्रीक, ल्याटिन, व संस्कृत भाषांत समानार्थक असल्यामुळें त्या ग्रीक लोकांनीं कल्पिल्या, किंवा ल्याटिन भाषा बोलणाऱ्या रोमन लोकांनीं कल्पिल्या, किंवा संस्कृत भाषा बोलणाऱ्या आर्य (हिंदु) लोकांनीं कल्पिल्या याविषयीं तर मोठेंच गूढ पडलें आहे. प्राचीन ईजिप्त देशी लोकांमध्यें मूळ वर्णन नसून उच्चारित शब्दांचा बोध ते शब्दार्थानुरूप चित्रें काढून करीत असत, व ते आणि खालडी लोक हे ग्रीक लोकांच्याहि पूर्वीं होऊन गेल्यामुळें त्यांनींच म्हणजे इजिप्त देशीं लोक व खालडी लोक यांनीं आपल्या कालच्या स्थितीस अनुसरून हीं क्रांतिवृतस्थ बारा राशींचीं नांवें कल्पिलीं असें पाश्चात्य बहुतेक ज्योतिष्यांचें मत आहे. सत्तावीस नक्षत्रें व रव्यादि नवग्रह याविषयीं वेदासारख्या † जुनाट ग्रंथांपासून तों पुराणादि आधुनिक ग्रंथांपर्यंत सर्वत्र कथा आढळण्यांत येतात, परंतु मेषादि बारा राशींविषयीं कोठें कथा (ग्रंथांत) आढळत नाहीं. यावरून मेषादि राशी प्राचीन आर्यांनीं ग्रीक लोकांपासून घेतल्या असाव्या असें दिसतें. ग्रीक व ल्याटिन पुराणांत मेषादि बारा

---

* यांपैकीं मुख्य मुख्य राशींचीं नावें रा० रा० केरो लक्ष्मण छत्रेकृत सि. प. वि. शा० २१८ यांत पहावीं.

† तैतिरीय संहिता २ रें कांड ३ रा प्रपाठक ५ वा तैतिरीय ब्राम्हण अनुवाक पहा ३ रें कांड १ ला प्रपाठक १ ला अनुवाक.

राशी व इतर प्राचीन राशी यांविषयीं कथा आढळतात. त्यांपैकीं मेषादि बारा राशींच्या कथा सवडीनुसार आपणांकडे पाठविण्याचा विचार आहे.

आतां पाश्चात्य ज्योतिषी ख्यालडी व इजिप्त देशी लोकांनीं कल्पिलेल्या बारा राशींची उपपत्ति कशी करितात तें सांगतों. ख्यालडी व इजिप्त देशी लोक यांचा धंदा धनगरपणाचा म्ह० मेंढरें आदिकरून जनावरें पाळण्याचा असल्यामुळें सूर्याचे खगोलस्थ स्थलविशेषाचे योगानें वार्षिक चार ऋतूंत होणारा बदल बरा किंवा वाईट असेल त्याप्रमाणें आपणास प्रिय किंवा अप्रिय जनावरांचीं नावें ते त्या त्या स्थळींच्या राशींस देत, म्हणून मार्च, एप्रिल, व मे हे तीन महिने मिळून होणारा आल्हादकारक जो वसंत त्या समयींच्या सूर्याचे राशींस आपणास प्रिय जीं मेष, * वृषभ, व जुळें हीं जनावरें त्यांचीं नावें त्यांनीं दिलीं. पुढें जूनचे २२ वे तारिखेचे सुमारास सूर्य उत्तरायण झाल्यामुळें मागें फिरतो ती सूर्याची वक्र (उलट) गति दाखविण्याकरितां कर्क (खेंकडा) हें योग्य नांव त्या राशीस दिलें. पुढें जो ग्रीष्म ऋतूंत अतिशय ताप होतो तो दाखविण्याकरितां अति क्रूर व हिंस्र जो सिंह त्याचे नांवाची योजना केली. खेरीज ग्रीष्मांत तृषाक्रांत झाल्यामुळें नील नदीचें पाणी पिण्याकरितां वारंवार आलेले सिंह दृष्टीस पडत, हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. पुढील राशींत सूर्यानें प्रवेश केला म्हणजे शेत कापणीचा समय येऊन ठेपतो. त्यामुळें हातांत धान्याचें कणीस घेतलेल्या शेतकऱ्याचे मुलीचें (कन्येचें) नांव त्या राशीस दिलें. पुढें सूर्य संपातीं आल्यामुळें रात्र दिवस सारखे [समतोल] होतात हें दाखविण्याकरितां तागडीची (तुला) योजना केली हें यथायोग्यच होय. नंतर शरदांत फलादिकांची समृद्धि होऊन त्यांचे अतिरिक्त भक्षणानें त्या ऋतूंत अनेक व्याधि मनुष्यांस जडतात, हें दुष्ट विंचवाचे (वृश्चिकाचे) योगानें दर्शविलें. पुढें हिवाळ्यांत झाडांचीं पानें गळून जातात हें धनुर्धर व त्यांचे धनुष्य (धनुः) व बाण या घातुक सामग्रीनें सुचविलें. नंतर दक्षिणायनान्त झाल्यावर सूर्य उत्तरेकडे वळून चढत आहे. हें डोंगरावरून व खडकांतून उड्या मारणाऱ्या बकऱ्याच्या (मकराच्या) द्वारें दर्शविलें. पुढें हिवाळ्याचे शेवटीं जिकडे तिकडे भयाण व ओसाड पृथ्वी दिसते. ही गोष्ट एक पुरुष कुंभांतून पाणी ओतून टाकीत आहे, असें चित्र काढून दर्शविली. पुढें

* चित्रयुक्त नकाशा किंवा कृत्रिम गोल जवळ घेऊन हा मजकूर वाचल्यानें विशेष फायदा होईल.

हिंवाळा संपून गेला, व जिकडे तिकडे नद्या आटून वाळून गेल्या, म्हणून मासे धरणें फार सुलभ झाल्यामुळें त्या समयींचें सूर्याचें स्थान पुच्छाग्रीं दोरीनें बांधिलेल्या दोन मत्स्यांनीं दाखविलें आहे. कळावें लोभ असावा हे विनंती. मु० रत्नागिरी ता० २९ मार्च १८७७.

आपला

ज० बा० मो०

रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि०. खालीं लिहिलेलें गाणें एका वृद्ध मांगगारोडणीच्या तोंडचें ती दारोदार पोटाकरितां भीक मागत असतां ऐकिलें. तें विचारज्ञ, मराठी भाषेचे मार्मिक, आणि लोकव्यवहार जाणणारे अशा कुटुंबवत्सल पुरूषांनीं वाचून पाहून, त्यांत काय तात्पर्य आहे हें मनांत आणून तदनुसार कोठें कोणाच्या घरीं वागणूक असल्यास, सुधारावी. या हेतूनें आपल्या विद्वज्जनमान्य मालेंत एखाद्या शेवटास ओंवण्यासारखें असल्यास ओंवाल ही खात्री आहे.

अन्योक्ति.

गाणें.

आज म्यां नवल पाहिलें ॥ कुत्रे वराडा चाललें
मुंगस उंटावर बसलें ॥ १ ॥
बेडुक तुडमुड बाजा करी । घोरपड सख्याची नवरी ॥ २ ॥
काळ घूशीनें घेतलेन रान । उंदिर घरांतला परधान ॥
खोंकड माकड सवाशीण ॥ ३ ॥
चिमण्या करवल्या मिरवती । घामिण रूसून जाती ॥ ३ ॥
तिला सरडा समजावितो । कोल्हा दरडीवर नाचतो ।
पाण्यांत मासा काय हांसतो ॥ ४ ॥
बगळा म्हणतो मी बामण । तुमचें लगीन लाविन ।
घार म्हणती मी मांगिण । तुमचें आंगण झाडिन ॥
डुकरिण म्हणती मी सुगरीण । खाशा पोळ्या रांधीन ॥ ५ ॥
वाघ म्हणतो मी जगजेठी ॥ या सभेला पान वाटी ॥
लांडगा म्हणतो मी बळकट । उचलिन सभेचें ताट ॥ ६ ॥

विंचू म्हणतो मी शिपाई ॥ नाचवीन ठाईं ठाईं
नवल म्हणती काय राधाबाई ॥ ७ ॥

अशी शुभ कार्यास मंडळी असल्यावर मग त्या कार्याची काय मौज पाहवी ! !

हें अन्योक्ति गाणें कोणत्या बाईनें केलें असावें तें नांवावरून सिद्ध आहेच, परंतु तिनें मनांत काय उद्देश आणून गायलें असावें याचा आपण टिपेंत उलगडा कराल हें प्रतिमासिक निबंधमालेच्या अंकावरून प्रचीतीस आलेलें आहेच हे विनंती. शुद्धाशुद्ध पाहून छापावें ही प्रार्थना आहे.
श्री क्षेत्र प्रकाशें जि० खानदेश ता० १० मार्च १८७७.

आपली

माला धारण करणार
देशपांड्या.

वर्गणीची पोंच.

रा० रा० बाळकृष्ण वामन गव्हाणकर.	२	१४
,, ,, त्रिंबक केशव परचुरे.	२	१४
,, ,, गोविंद काशिनाथ फडनीस.	२	१४
,, ,, काशिनाथ कृष्ण लेले.	६	०
,, ,, कृष्णाजी आबाजी गुरुजी.	२	१४
,, ,, परशुराम नीळकंठ पटवर्धन	२	१४
,, ,, रामचंद्र नारायण जोगळेकर.	२	८
,, ,, विठ्ठल कृष्ण चक्रपाणि.	२	१४
——— नेटिव्ह लायब्ररी, संगमनेर.	२	१४
———, दापोली.	२	१४
———, मालेगाव.	०	८
,, ,, मुकुंद विनायक सारंगपाणि	२	८
,, ,, मोरेश्वर दिनकर जोशी.	१	७
,, ,, रामचंद्र केशव बागाईतकर.	२	१४
,, ,, आत्माराम वळवंत वकील	२	१४
,, ,, नारायण कृष्ण धारप.	२	१४
,, ,, वासुदेव दाजी ढवळे.	२	८
,, ,, गंगाधर रामचंद्र किराणे.	२	१४
,, ,, गणेश गोपाळ प्रधान.	२	१४
,, ,, बापूराव कृष्ण वसईकर.	३	०
,, ,, चिंतो बाळकृष्ण.	२	१४
,, ,, विष्णु मोरेश्वर महाजनी.	२	१४
,, ,, पांडुरंग गोविंद.	२	१४
,, ,, गोपाळ नारायणशास्त्री साठे	६	१२
,, ,, महादेव गोपाळ करवडे	२	८
,, ,, गणेश बल्लाळ रानडे.	२	८

Registered No. 93 of 1877.

वर्गणीचे दर.

वर्षास अगाऊ २०८ रु०.   वर्षास मागाहून ३ रुपये.

टपाल हाशील वर्षाचे ०६ आणे.

विक्रीचीं पुस्तकें.

खालील पुस्तकें रोख पैसा पाठविला असतां तावडतोब रवाना करण्यांत येतील:——

	किंमत.	हाशील.
रसायनशास्त्र (रा० बाळाजी प्रभाकर गोडक यांनीं केलेलें.)	२०८	०१
रासलस. (जॉनसनच्या प्रसिद्ध इंग्रजी कादंबरीचें भाषांतर. हें माजी शालापत्रकावरून पुनः तपासून छापलेलें आहे.)	१	०२
टेंपेस्ट नाटक. (रा० नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं केलेलें.)	१	०२
साहित्यशास्त्र. (वे० शा० सं० गणेशशास्त्री लेले यांनीं केलेलें. थोडक्यांत समग्र विषयाची माहिती यावरून होण्यासारखी आहे.)	१	०२
अनंतफंदी. (वरील कवीच्या लावण्या, पोवाडे, व श्रीमाधव नाथ (ओंवीबद्ध) इतका यांत संग्रह आहे. परशरामकृत लावण्याही शेवटीं कांहीं जोडल्या आहेत.)	०१२	०२

☞ यासंबंधी पत्रव्यवहार प्रस्तुत पुस्तकाच्या पत्त्यावरच ठेवावा.